महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन — सैनिक कल्याण विभाग
छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र
विभागीय आयुक्त कार्यालय परिसर,नाशिक रोड, नाशिक - ४२२ १०१
ईमेल आय डी : pctcoic@yahoo.in दूरध्वनी क्र. : 0253-2451032

2551//प्र.नि./छाप्रके-3 दिनांक 26 सप्टेंबर २०२६

प्रति,

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी
जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय
सर्व जिल्हे (ई-मेलव्दारे)

**विषय : छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे चालणाऱ्या एस.एस.बी प्रशिक्षण वर्ग क्र. ६७ ची प्रसिध्दी करणेबाबत**

संदर्भ : १. विभागाचे पत्र क्र. १९००८/सैकवि-१९ दिनांक १६ एप्रिल २०१० आणि मा. संचालक, सैकवि, पुणे यांचे अर्धशासकीय पत्र क्र. १९००८/सैकवि-१९/३८९५ दिनांक ३१ डिसेंबर २०२५.

१. उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे महाराष्ट्रीयन नवयुवक व नवयुवतीं साठी SSB कोर्स क्र. ६७ चालविण्यासाठी मा. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांची मंजुरी मिळाली असुन केंद्रामध्ये तसे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालील नमूद प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | तपशिल | कालावधी/दिनांक |
|---|---|---|
| 1. | कोर्सचे नांव व क्रमांक | SSB कोर्स क्र. ६७ |
| 2. | कोर्स कालावधी | **दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ ते २८ ऑक्टोबर २०२६** |
| 3. | निवड केलेल्या प्रशिक्षणार्थीची यादी **E-Mail** व्दारे केंद्रास पोहचण्याची अंतिम तारीख | **दिनांक १६ ऑक्टोबर २०२६** |
| ४. | प्रशिक्षणार्थीनी केंद्रामध्ये पोहोचण्याची तारीख | **१८ ऑक्टोबर २०२६ सकाळी १० वाजता** |

जिल्हयास दिलेल्या प्रशिक्षणार्थी निवडीच्या उद्दीष्टाबाबत विभागाच्या संदर्भीय पत्रांमध्ये दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

२. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींना त्यांनी सोबत आणलेले प्रवेश पत्राची पडताळणी आणि प्रतिस्वाक्षरी करुन देण्यात यावे व केंद्रामध्ये येताना सोबत इयत्ता **दहावी** ते पदवी पर्यंतची सर्व मुळ प्रमाणपत्रे सोबत घेऊन येणेबाबत त्यांना अवगत करण्यात यावे. मुळ प्रमाणपत्रे कोर्सच्या कालावधीमध्ये सुरक्षा अमानत म्हणून केंद्रात जमा ठेवण्यात येतील. तसेच प्रशिक्षणार्थी जिल्हयामध्ये मुलाखतीस येते वेळी त्यांनी **Department of Sainik Welfare, Pune** यांच्या वेबसाईट www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन **DSW Portel (Resources - PCTC Nshik – SSB ६७)** किंवा व्हाटसअप क्र. 9156073306 वर संबंधित **परिशिष्टांची** प्रिंट काढून व ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावे. **प्रवेशपत्र** आणि **परिशिष्टांची Check List** आणि महत्वाच्या **तारखां नुसार** तपासणी करण्यात यावी. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींना दिनांक **१८ ऑक्टोबर २०२६ सकाळी १० वाजता** छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, वर्ग-२ अधिकारी निवासस्थाने, नाशिक रोड, नाशिक येथे हजर होणे बाबत अवगत करण्यात यावे.

३. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींची यादी **(PDF File)** मध्ये दिनांक **दिनांक १६ ऑक्टोबर २०२६** पर्यंत ई-मेल व्दारे या केंद्रास पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी ही विनंती .

४. सोबत जिल्हयाने प्रसिध्दीस द्यावयाचे बातमीपत्र व प्रसिध्दीस द्यावयाच्या बातमीपत्राच्या कार्यवाहीची निर्धारीत कार्यपध्दती जोडण्यात येत आहे.

PRE CADET TRAINING CENTRE Govt. of Mah. NASIK ROAD, NASIK

ले.कर्नल सोनवणे विलास शंकर (नि.)
प्रभारी अधिकारी
छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र,
नाशिक रोड, नाशिक

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रति,

मा. संचालक
सैनिक कल्याण विभाग (महाराष्ट्र राज्य)
रायगड इमारत, राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर
सोलापूर रोड, घोरपडी, पुणे – ४११ ००१

- माननियांचे माहितीस्तव सविनय सादर. तसेच **विभागाच्या वेब साईटवर Department of Sainik Welfare,Pune** www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर DSW **Portel** वर सदर प्रशिक्षण वर्गाची माहिती उपलब्ध करून देण्यात यावी ही विनंती.

# बातमीपत्र

## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुर्वणसंधी

1. **भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी** पात्र उमेदवारांना Service Selection Board (**SSB**) या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दिनांक **१९ ऑक्टोबर २०२६ ते २८ ऑक्टोबर २०२६** या कालावधीत **SSB** कोर्स क्र. **६७** आयोजित करण्यात येत आहे. **निवड झालेल्या प्रशिक्षणार्थीनी केंद्रामध्ये १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रात हजर राहावे** .

कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

2. तरी, ________जिल्हयातील इच्छुक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदाची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय ____________ येथे दिनांक ______________रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी **Department of Sainik Welfare, Pune** यांच्या वेबसाईट www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन **DSW Portel (Resources - PCTC Nshik – SSB ६७) (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या)** प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पुर्ण भरुन सोबत घेऊन यावे.

3. सदर एस. एस. बी. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेवून यावेत :-

अ) **कंम्बाईंड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन** ( CDSE-UPSC) **अथवा नॅशनल डिफेंस ॲकेडमी एक्झामिनेशन** (NDA-UPSC) **पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे.**

ब) **एनसीसी स्पेशल एन्ट्री साठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.**

क) **टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.**

ड) **विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एस.एस.बी.साठी शिफारस केलेल्या यादीत नांव असावे.**

4. अधिक माहीतीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा **ईमेल आय डी : training.pctcnashik@gmail.com** व दूरध्वनी क्र. 0253-2451032 किंवा व्हाटसअप क्र. 9156073306 वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ______________ यांनी केले आहे.

**जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी**

________________

# प्रवेश अर्ज : एस.एस.बी. – ६७

फोटो

1. नांव (पुर्ण) :

2. लिंग : M F 3. जन्म तारीख :

| D | D | M | M | Y | Y |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

4. धर्म/जात :

5. पत्ता पिन कोड नंबर सहीत:

6. मोबाईल नंबर : Email Id :

7. आई/वडील यांचा मोबाईल नंबर :1. वडील________________2. आई/भाऊ______________
(आई / वडील हयात नसतील तर पालकांचे नांव व मो.नंबर पाल्याच्या नात्यासह नमूद करावा).

8. आधार कार्ड नंबर (सोबत छायांकित प्रत जोडावी ) :

9. शैक्षणिक माहिती :

| Qualification | Name of Board | Year in which exam passed | Marks obtained in % |
|---|---|---|---|
| SSC Exam | | | |
| HSC Exam | | | |
| Graduation | | | |
| Others | | | |

10. N.C.C. परीक्षा पात्र असल्यास त्याची माहिती :

11. CDS/SSB Call letter photo copy attached : Yes/No

12. शाखेसाठी प्रवेश (IMA/OTA/AFA/INA) :

**प्रशिक्षणार्थी स्वाक्षरी** ________________

## पालकांचे संमतीपत्र

मी माझा मुलगा/मुलगी/पाल्य ______________________________________यास छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये **दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ ते २८ ऑक्टोबर २०२६** पर्यंत होणाऱ्या एस.एस.बी प्रशिक्षण वर्ग क्र. **६७** मध्ये प्रवेश घेण्यासाठी संमती देत आहे आणि सोबत दिलेल्या परिशिष्ट क मधील सर्व नियम, अटीं व सूचना मला मान्य आहे व त्याचे पालन करण्याची जबाबदारी माझ्या पाल्याची राहील.

पालकाची सही ________________

पालकाचे नांव ________________

आधार कार्ड नंबर ________________

**मा. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, ______________ यांची शिफारस**

केंद्रामध्ये SSB कोर्स मध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे:-

**अ) कंम्बाईड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन** ( CDSE-UPSC) **अथवा नॅशनल डिफेंस ॲकेडमी एक्झामिनेशन** (NDA-UPSC) **पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे.**

**ब) एनसीसी स्पेशल एन्ट्री साठी एसएसबी कॉल लेटर असावे.**

**क) टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.**

**ड) University Entry Scheme साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबी साठी शिफारस केलेल्या यादीत नांव असावे.**

**प्रवेशासाठी शिफारस करण्यात येत आहे / नाही**

Place : AZSWO/ZSWO

Date :

---

## प्रवेश अर्जासाठी आवश्यक सूचना

❖

❖ **प्रशिक्षणार्थीनी केंद्रामध्ये पोहोचण्याची तारीख १८ ऑक्टोबर २०२६ सकाळी १० वाजता राहील.**

१. जर प्रशिक्षणार्थ्यांची संख्या क्षमतेपेक्षा जास्त (५०) झाल्यास त्यांची प्रशिक्षण केंद्रात प्रवेश पूर्व परीक्षा दिनांक **१९ ऑक्टोबर २०२६ सकाळी १० वाजता** घेण्यात येईल व गुणवत्ता यादी नुसार प्रवेश देण्यात येईल.

२. या केंद्रामध्ये देण्यात येणारे प्रशिक्षण हे मार्गदर्शन व परिक्षेची पुर्व तयारी करण्याकरीता आहे याची नोंद घ्यावी.

३. प्रशिक्षण केंद्र हे नाशिक रोड रेल्वे स्टेशन पासून एक किलोमिटर इतके अंतरावर असून विभागीय आयुक्त कार्यालयाच्या आवारात व जिल्हा कौटुंबिक न्यायालय जवळ, नाशिक रोड,नाशिक.

४. प्रतीस्वक्षरी झालेला प्रवेश अर्ज आणि मूळ कागदपत्रासाहित हे प्रवेश अर्ज आपणास मिळाल्यावर दिलेल्या तारखेस वेळेवर केंद्रात हजर रहावे अन्यथा प्रवेश रद्द होईल.

परिशिष्ट 'अ'

# MEDICAL FITNESS CERTIFICATE

1. Based on the assessment made in my clinic/Hospital/Nursing home, I Dr.______________________________________ (Doctor Name) believe that Miss/Mr __________________________________son of Shri ____________________________ is mentally and physically FIT / UNFIT to undergo 10 days training/coaching for SSB Course to be held at Pre Cadet Training Centre, **Nashik** **From 19 Oct 2026** To **28 Oct 2026.**

2. He / She is on medication prescribed by Dr______________________ - **Yes / No**

(if Yes, then attach priscription paper duly singed by the concerned doctor)

Date :

Place :

Signed by Registered Medical Practitioner

A.M.A.__________________

Regd No__________________

(NOT ON ORIGINAL STAMP PAPER)

परिशिष्ट 'ब'

# BOND

Know all men by these presents that I ____________________________________

(Name of the candidate) of (Address____________________________________________

____________________________ am held and firmly bound unto **THE GOVERNMENT OF MAHARASHTRA ;** hereinafter called as (Government) which expression shall unless excluded by or repugnant to the context include his/her successors and assign in the sum of **Rs. 45,000/**- to be paid to Government for which payment , will and truly to made I bind myself, my heirs , executers, administrators, legal representative by this presents.

Dated this ______________day of ___________________________________

**WHERES** Shri _____________________________________(hereinafter called the candidate)

Has been selected by the panel of selections for SSB Course to be conducted at Pre Cadet Training Centre Nasik for a period of 10 **days** with effect from **19 /10/2026 TO 28/10/2026** on the condition that the candidate shall complete his training at the Training Centre.

AND WHEREAS **during the course of the training the Government has agreed to give to the candidate so selected facilities of free lodging and boarding**.

**NOW THIS BOND is considered to be valid if the candidate.**

**1. is diligent in the presentation of this training at the Training Centre and is faithful in the observance of the Rules and Regulations of the Training Centre and shall be of good conduct and attends the course regularly and while under training marks progress to the entire satisfaction of the Government.**
**2. does not leave the training without the permission of the Officer-in-Charge of the Pre-Cadet Training Centre.**
**3. shall, during the course of training, bear all medical and other charges on account of any treatment he /she may undergo for any injury or ailment of any kind.**
**4. before commencement of of his /her training at the training center shall apply for the CDSE /SSB Exam. In the Indian Army/ Navy /Air Force and if selected shall join the Defence Services of India forthwith, otherwise this bond shall remain in full force .**

**AND the candidate hereby agrees not to hold the Government liable and claim any compensation for any loss during the training at the training centre.**

And **in the event of the candidate committing a breach of any of the terms and conditions the whole amount of Rs.45,000/- or such less as may be found by the Government in Administrative Department. Government of Maharashtra to have been incurred on account of such training ; the decision of the Government regarding which shall be final and binding and shall become forthwith payable by the said candidate on demand and the amount so payable shall without prejudice to the other remedies of the Government be recoverable from the candidate as arrears of land revenue.**

IN WITNESS WHERE OF **the said candidate has set his hand the day and the year first above written.**

**Shri.**_________________________________________**within named; candidate in presence of -**

**1) Name & Address of the Witness** ____________________________________________

**2) Name & Address of the Witness** ____________________________________________

Signature of Candidates

## VERIFICATION & COUNTERSIGNATURE

The above information has been verified and found to be correct.

Place : Signature of AZSWO/ZSWO

Date : with stamp

**(For and on behalf of the Director Department of Sainik Welfare, Maharashtra)**

परिशिष्ट 'क'

# छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक

## केंद्रातील निवासस्थानात प्रशिक्षणार्थीना वास्तव्यास असतांना पाळावयाचे नियम, अटी व सूचना

१. . छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे प्रशिक्षणार्थीनी प्रवेश घेतल्यानंतर प्रशिक्षण कालावधी पुर्ण करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षण अर्धवट सोडून दिल्यास करारनाम्यानुसार शासकीय दंड तसेच झालेल्या भोजन व निवास खर्चाची पुर्ण भरपाई करावी लागेल.

२. प्रशिक्षणार्थीना कोणतेही किमती सामान आणण्यास सक्त मनाई आहे, जर ते सामन आत्यवश्यक असले तर त्या सामानाची जबाबदारी स्वत: त्या प्रशिक्षणार्थीची असेल. जसे सोन्याचे अभुषण, लॅपटॉप, महागाई मोबाईल इत्यादी.

३. प्रशिक्षणार्थीना या कोर्सच्या कालावधी मध्ये कोणते ही आमली पदार्थ सेवन करण्यास सक्त मनाई आहे. जसे बिडी,सिगारेट,तंबाकु अल्कोहोल युक्त पदार्थ, ड्रग्स इत्यादी वरील नियमांचे केंद्रामध्ये प्रवेश मिळाल्यानंतर पालन करणे बंधनकारक आहे. जर असे सेवन करताना आढळल्यास त्या प्रशिक्षणार्थीला त्या कोर्स मधून कायम स्वरुपी काढण्यात येईल आणि नियमानुसार कडक कार्यवाही करण्यात येईल.

४. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथील प्रशिक्षण केंद्र हे नि:शुल्क असुन कोणीही, कुणालाही, कोणत्याही प्रकारचे शु:ल्क देवू नये.

५. प्रशिक्षणार्थी निवासकक्ष, भोजनालय, प्रशिक्षण वर्ग आणि आवार स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकावर राहील. येथील भिंतीवर लिखाण/ रेघोटया/ चित्र काढून विद्रूप करु नये व वस्तुंची तोडफोड करण्यात येवू नये तसे केल्यास त्याची भरपाई सक्तीने करुन घेण्यात येईल.

६. बाथरुम, शौचालय व कपडे स्वच्छ करण्यासाठी पाण्याचा योग्य व जपून वापर करावा. बाथरुम मधील पाणी पिण्यासाठी वापरु नये. निवास कक्ष, भोजनालय व प्रशिक्षण वर्गातील पंखे व लाईटचा योग्य आणि गरजेनुसार वापर करावा. लाईटवर चालणारी ईस्तरी किंवा इतर उपकरणे वापरु नयेत.

७. प्रशिक्षणार्थीची अचानक तब्बेत बिघडल्यास तात्काळ डयूटी प्रशिक्षक/महिला सहाय्यक यांना कळविण्यात यावे.

८. केंद्रात धुम्रपान किंवा मद्यपान करण्यास सक्त मनाई आहे तसे आढळल्यास संबधित प्रशिक्षणार्थीवर दंडात्मक कार्यवाही करुन प्रशिक्षण केंद्रातून काढण्यात येईल.

९. शारिरीक तसेच कवायत प्रशिक्षण वर्ग आणि प्रशिक्षण वर्गात असतांना योग्य गणवेषात असणे आवश्यक आहे.

१०. प्रशिक्षण वर्ग सुरु असतांना प्रशिक्षणार्थीनी निवासकक्ष बंद करुन सदर निवासकक्षाच्या कुलपाची किल्ली प्रमुखाकडे असणे आवश्यक आहे. तसेच निवासकक्ष बंद करतेवेळी त्यामधील लाईट व पंख्यांची बटने बंद केली आहेत याची खात्री करुन त्यानंतर निवासकक्ष बंद करण्यात यावा.

११. प्रशिक्षणार्थीची प्रशिक्षणकक्ष, निवासकक्ष, भोजनालय, मनोरंजन कक्ष आणि खेळ प्रतिनिधी या पदांवर नेमणूक झाल्यावर त्या पदाच्या जबाबदारीचे काटेकोरपणे पालन करावे.

१२. प्रशिक्षणार्थी निवासस्थान आवाराचे बाहेर जाण्यापूर्वी परवानगी घेणे (आउट पास) आवश्यक आहे.

१३. प्रशिक्षणार्थीनी बाहेरील बाजारातील उघडयावरील अन्नपदार्थ खावू/सेवण करु नयेत.

१४. प्रशिक्षणार्थी निवासस्थानाचे आवारात, भोजनालय, प्रशिक्षणवर्ग आणि परिसरात कसल्याही प्रकारचे गैरवर्तणूक (भांडण, शिवीगाळ इत्यादी) होता कामा नये तसे झाल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

१५. रात्री १०.०० वाजले नंतर प्रशिक्षण केंद्राच्या निवासाचा मुख्य लोखंडी दरवाजा बंद झाल्या नंतर बाहेर जाण्यास सक्त मनाई आहे.

१६. प्रशिक्षणार्थी निवासस्थानाचे आवारात, भोजनालय, प्रशिक्षण वर्ग आणि परिसरात लुंगी, बनियान, अंडरविअर व टॉवेल घालून फिरणे सक्त मना आहे.

१७. प्रशिक्षणार्थी भोजन ठेकेदार अथवा त्यांचे कर्मचा-यां सोबत तक्रार अथवा हुज्जत घालू नये. भोजन करताना शांतता पाळावी तसेच जेवणासंबधी तक्रार असल्यास भोजन प्रतिनिधी/प्रशिक्षक/भांडारपाल किंवा प्रभारी अधिकारी यांचेकडे तक्रार नोंद करावी.

१८. प्रशिक्षणार्थीना सकाळचा नाश्ता, दुपारचे भोजन आणि रात्रीचे भोजन योग्य गणवेषातच, भोजनगृहात घ्यावयाचे आहे. प्रशिक्षणार्थीना निवास कक्षात भोजन घेवून जाणेस सक्त मनाई आहे.

१९. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे प्रशिक्षणार्थींनी प्रवेश घेतल्यानंतर प्रशिक्षण कालावधी पुर्ण करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षण अर्धवट सोडून दिल्यास करारनाम्यानुसार शासकीय दंड तसेच झालेल्या भोजन व निवास खर्चाची पुर्ण भरपाई करावी लागेल.

२०. प्रशिक्षण केंद्रातुन मिळालेले साहित्य कोर्स समाप्ती नंतर स्वच्छ धुऊन/दुरुस्त करुन ते सुव्यवस्थीत जमा करावे.

२१. प्रशिक्षण केंद्राच्या आवारात फक्त विद्यार्थ्यांच्या पालकांना पूर्व परवानगीने प्रवेश देण्यात येईल व पालकांना भेटण्यासाठी मनोरंजन कक्ष उपलब्ध केला जाईल. पालकांना भेटण्याची वेळ सायंकाळी **१७.३० ते १९.३०** पर्यंत ठेवण्यात आली आहे.

२२. केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थींना कोर्सबाबत वाटप करण्यात येणारी पुस्तके गहाळ/हरविला असता प्रशिक्षणार्थींना वाटप करण्यात आलेल्या पुस्तकावरती नमूद लेखकाचे पुस्तके बाजारातून खरेदी करुन जमा करावे त्या बदल्यात त्याची किंमत स्विकारली जाणार नाही किंवा दुस-या लेखकाचे पुस्तके जमा करुन घेतले जाणार नाही. तसेच वाटप करण्यात आलेल्या पुस्तकां वरती पेन्सील अथवा पेनाने कोणाचे नांव अथवा कोणत्याही प्रकारचे लिखाण करण्यास सक्त मनाई आहे. कोर्स संपल्यानंतर पुस्तके जर फाटली असतील तर ती चिकटवून सुव्यवस्थित करुन जमा करण्यात यावीत.

२३. योग्य कारणाशिवाय लेखी अर्ज देऊन त्यावर परवानगी घेतल्या शिवाय स्वत:चे गावी किंवा इतर कोठेही बाहेरगांवी जाण्यास परवानगी मिळणार नाही, तसेच एखादी महत्वाची परीक्षा किंवा Emergency वगळून साधारणतः प्रत्येकी 90% हजेरी कोर्स पुर्ण करण्यासाठी आवश्यक आहे. या पेक्षा जास्त दिवस गैर हजर असणारे प्रशिक्षणार्थी कोर्स साठी अपात्र ठरवण्यात येतील.

२४. प्रशिक्षणासाठी येण्याचा व जाण्याचा तसेच खाजगी खर्च स्व:त करावा लागेल. तसेच प्रशिक्षणासाठी येताना कोणतेही वाद्य, कॅमेरा, टेपरेकॉर्डर, भ्रमणध्वनि, रेडीओ, अंगठी, लॉकेट तसेच गरजेपेक्षा जास्त किंमती सामान आणू नये.

**वरील सर्व नियम व अटी मला मान्य आहेत व मी त्यांचे व्यवस्थितरित्या पालन करण्याची ग्वाही देत आहे.**

**प्रशिक्षणार्थी स्वाक्षरी**____________________

# आवश्यक सूचना

**सोबत आणावयाचे कपडे, साहित्य, शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि केंद्रातून दिले जाणारे साहित्य/सामान**

१. **प्रशिक्षणार्थींनी स्वत:च्या वापरासाठी पुढील प्रमाणे सामान/साहित्य सोबत आणावेत.(मुले / मुली)**

**अ) फॉर्मल ड्रेस क्लासरूम** :- पांढरा फुल बाजू शर्ट- २ , फॉर्मल ब्लॅक लांब पँट -२ , लेदर ब्लॅक शुज-१, काळे मोजे- २ जोडी , फॉर्मल ब्लॅक बेल्ट - १,

**आ) पी.टी व ड्रिल परेड साठी** :- पांढरा स्वेटर - १, पांढरे टी शर्ट - २, (पांढरी हाफ पँट-2 मुलांसाठी),

पांढरा कॅन्हवॉस/स्पोर्ट बुट- १, पांढरे मोजे-२ जोडी, ट्रेकसूट - १. (लॉग ट्रेक पँट- २ मुलीनसाठी),

**इ) इतर साहित्य** :- खाजगी ड्रेस जरुरीनुसार, आंघोळीचे सामान, सुटकेस, गुडनाईट मशीन व वडी, डिक्शनरी, लोखंडी कॉटवर गादीवर अंथरण्यासाठी बेडशीट- १ , ब्लँकेट-१, मच्छरदाणी - १, मच्छरदाणी लावणेसाठी व कपडे सुखवण्यासाठी रस्सी, जरुरी नुसार थंड / गरम कपडे.

**ई) मुलां/मुलींसाठी लेखन साहित्य आणि प्रमाणपत्रे** :- पेन, पेन्सील, रजीस्टर, A- 4 साईजचे 50 कोरे पेपर, ( छत्री /रेनकोट-पावसाचे कालावधीत प्रशिक्षण असल्यास), इयत्ता 10 वी ते पदवीपर्यंतची सर्व मुळ प्रमाणपत्रे व गुणपत्रीका व त्यांच्या छायाकिंत प्रत्येकी एक प्रत, नोंदणीकृत वैद्यकिय अधिका-याचे शारिरीक व मानसिक तंदुरुस्त असल्या बाबतचे प्रमाणपत्र येतांना सोबत घेवून यावेत.

**उ) उमेदवारास वापरा करीता केंद्रातर्फे पुढील प्रमाणे सामान दिले जाईल.** :- गादी-1, उशि-१, उशि खोळ-१, कॉट-१ , ब्लँकेट-१,चादर-१, ताट-१, वाटया-२, ग्लास-१, इत्यादी.

**प्रशिक्षणार्थी स्वाक्षरी**____________________